# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## प्रादेशिक बातमीपत्र
## सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः29.03.2026** **वारःरविवार**

---

- पश्चिम आशियात तणाव असतानाही भारत अविरत प्रगतीच्या दिशेने मार्गक्रमण करत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- १५० दिवस ई-गव्हर्नन्स उपक्रमातल्या उत्कृष्ट कार्याबद्दल राज्यातील विविध स्वराज्य संस्थांचा गौरव
- पंतप्रधान आज आकाशवाणीवरुन करणार मनकी बात
- आणि
- राज्यातल्या काही भागात उष्णतेचा पारा चाळीशीपार, सोलापूरमध्ये पावसामुळं नुकसान

**पंप्र**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या परिस्थितीतही भारत अविरत प्रगती करत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. उत्तर प्रदेशातल्या गौतम बुद्ध नगर जिल्ह्यातल्या जेवर इथं नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन करताना ते काल बोलत होते. गेल्या एक महिन्यापासून पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे अनेक देशांना अन्नधान्य, पेट्रोल-डिझेल, गॅस आणि खते यांसारख्या अत्यावश्यक वस्तूंच्या तुटवड्याचा सामना करावा लागत आहे. भारत आपल्या नागरिकांच्या सामर्थ्यावर अवलंबून आहे आणि पूर्ण ताकदीने या संकटाचा सामना करत आहे असं ते म्हणाले---

कच्चा तेल ओर गॅस ये जहा युद्ध चाल रहा है ना इस प्रभावित इलाकेसे मंगवाते है| इसलिये सरकार हर वो कदम उठा राही है जीससे सामान्य परिवारोपर हमारे किसान भाई बेहेनोपर इस संकट का बोझ न पडे| साथियो संकट के इस समय मी भी भारत ने अपने तेज विकास को निरंतर जारी राखा है|

**निवेदन-केंद्र**

पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने देशातल्या सर्व पेट्रोल पंपांवर पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा पुनरुच्चार केला आहे. सर्व तेल शुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू असून, काल एकाच दिवसात ५४ लाखांहून अधिक एलपीजी सिलिंडरचे वितरण करण्यात आले आहे, असं केंद्र सरकारनं जारी केलेल्या निवेदनात स्पष्ट केलं. परदेशात अडकलेल्या भारतीयांच्या सुरक्षेसाठी सरकारने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले असून, आतापर्यंत ५ लाख नागरिक मायदेशी परतले आहेत,अशी माहितीही या निवेदनांत देण्यात आली आहे.

**कारवाई**

इंधन उपलब्धतेबाबत अप्रमाणित माहिती पसरवून नागरिकांमध्ये घबराट निर्माण केल्याप्रकरणी पुणे कॅन्टोनमेंट परिसरातल्या एका पेट्रोल पंपावरील विक्री आणि इंधन पुरवठा तत्काळ प्रभावानं स्थगित करण्यात आला आहे. तर सिलेंडर वितरण करताना, शासनानं ठरवून दिलेल्या प्राधान्यक्रमाचं पालन न करता, अनधिकृत आणि नोंदणी नसलेल्या व्यक्तींना सिलेंडर वाटप करणाऱ्या पुण्यातल्या एका गॅस एजन्सीचा व्यवसायिक एलपीजी सिलेंडरचा पुरवठा आणि वितरण जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ बंद केलं आहे.

**भुजबळ**

महाराष्ट्रात, पाईपद्वारे नैसर्गिक वायूचा  पुरवठा करणाऱ्या जाळ्याचा विस्तार ,अधिक वेगाने करण्यासाठी केंद्र सरकारनं तांत्रिक सहाय्य आणि पायाभूत सुविधांसाठी विशेष आर्थिक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी

काल नवी दिल्लीत केली. विज्ञान भवन इथं आयोजित उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते.

**प्रथम-क्रमांक**

150 दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा' कार्यक्रमांतर्गत निवडलेली, उत्कृष्ट कार्यालयं आणि सेवाकर्मींचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल मुंबईत सन्मान करण्यात आला. पुणे जिल्हा परिषदेनं राज्यात पहिला क्रमांक पटकावला. याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांना प्रथम क्रमांकाचं प्रशस्तीपत्रक देण्यात आलं.
सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून लोककल्याणकारी योजनांची, प्रभावी अंमलबजावणी करण्यात मोलाची भूमिका बजावल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, नाशिक जिल्ह्यात कायद्याचा बालेकिल्ला उपक्रम राबविणारे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.
प्रशासकीय कामात पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हतेच्या  त्रिसूत्रीवर सर्व विभागांनी काम करावं असं आवाहन याप्रसंगी करताना मुख्यमंत्री म्हणाले...

या विभागाचे नवीन आकृतिबंध तयार झालेले आहेत रिक्रूटमेंट रूल्स नव्यानं तयार झालेले आहेत.  एच आर सिस्टीम सुधारते आहे. ४० हजार लोकांचं प्रमोशन आपण त्यानिमित्तानं करू शकलेलो आहे आणि आपल्या गव्हर्नमेंट प्रोसेसेसचं रीइंजिनिअरिंग केलय त्यामुळे लोकांना लागणार्या ज्या ९०% सेवा आहेत त्या सेवांमध्ये आता आपण अर्जामधल्या फिल्ड ४०%नी कमी केलेल्या आहेत, डॉक्युमेंट्स५० % नि कमी केलेले आहेत,त्यांना लागणारा वेळ अगदी नगण्य केलेला आहे.

**मकीबा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमातून देशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. या मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा १३२ वा भाग असेल. या कार्यक्रमाचं प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्कवर, तसेच 'AIR News' च्या संकेतस्थळावर आणि 'Newsonair' मोबाईल ॲपवर केलं जाईल. याव्यतिरिक्त, 'AIR News', 'DD

News', पंतप्रधान कार्यालय (PMO) आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या YouTube वाहिन्यांवरही याचं थेट प्रक्षेपण केलं जाईल.

**पल्स परिषद**

पल्स परिषदेच्या निमित्ताने औषधनिर्मिती प्रक्रिया क्षेत्रात काही धोरणात्मक आणि गुतंवणुकीचे करार झाले आहेत आणि त्यामुळे या क्षेत्रात निश्चितपणे राज्याला प्रगती करता येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत व्यक्त केला. जिओ कनव्हेंशन सेंटर इथं आयोजित पल्स परिषदेत नेक्सट जेन फार्मा ॲंड मॅन्युफॅक्चरिंग' या विषयावरील चर्चासत्रात भविष्यकालीन औषधनिर्मितीवर तज्ञांनी चर्चा केली. या चर्चासत्रात देश-विदेशातील औषधनिर्मिती आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले होते. पल्स वैद्यकीय परिषदेत रायगड इथल्या बल्क ड्रग पार्क आणि लाईफ सायन्सेस संदर्भात चर्चा झाली.

**मंजुरी**

राज्यातल्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी, राज्य शासनाने सोलापूरमधील अक्कलकोट रस्ता आणि होटगी रस्त्यावरील औद्योगिक वसाहतीतल्या एकंदर 44 रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी 55 कोटी 94 लाख रुपयांच्या कामांना आर्थिक मंजुरी देण्यात आल्याचा शासन निर्णय काल जाहीर केला. ही मंजुरी महाराष्ट्र औद्योगिक पायाभूत सुविधा निर्मिती आणि विकास योजनेअंतर्गत देण्यात आली आहे. गेल्या 13 मार्चला मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 13 व्या उच्चस्तरीय समिती बैठकीत हा निर्णय घेण्यात आला होता.

**बेंबळा प्रकल्प**

यवतमाळ जिल्ह्यातील् बेंबळा प्रकल्प, बेंबळा कालवे पुनर्वसन आणि डेहणी उपसा सिंचन योजनेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा यवतमाळ इथं आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी काल घेतला. पुनर्वसन प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यांच्या अपेक्षा यावर सखोल चर्चा करण्यात आली.

**हवामान नाशिक, सोलापूर**

नाशिक जिल्ह्यातल्या मालेगाव शहर आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा चढता असून काल ४० पुर्णांक २ इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली. सोलापूर जिल्ह्यातही काही भागात पारा ४० च्या पुढे गेला आहे. मात्र  गेल्या काही दिवसापासून सोलापूर शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात गारपीट आणि वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. यामुळे जिल्ह्यातल्या १७० गावातील ३ हजार पेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या, २ हजार हेक्टर पीकांचं नुकसान झाल्याचा अंदाज आहे. या भागातल्या नुकसानाचे पंचनामे करण्यात येत आहेत. उष्माघाताच्या रुग्णांना तत्काळ उपचार मिळावेत यासाठी धुळे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यातल्या  सर्व ४३ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात कक्ष सुरू करण्यात आले आहेत. या कक्षांमध्ये आवश्यक औषधे, थंड पाणी आणि प्रथमोपचाराचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असून आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

**हवामान**

दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातल्या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांसह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचे वारे वाहण्याची दाट शक्यता आहे. विदर्भात आज हवामान कोरडं राहील, मात्र उद्यापासून तीन दिवस वादळी पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.